SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX – (0231) 2609000, 2609089
FAX : 0091-0231-2691533, 2692333, 2693294

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९)
फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३, २६९२३३३, २६९३२९४.
Website : www.unishivaji.ac.in E-mail : affiliationt1@unishivaji.ac.in

"A"
Re-accredited By
NAAC (2014)
With CGPA - 3.16

जा.क्र. संलग्नता/टे.५/एनडीएल/ 169 दिनांक :- 16 MAR 2015

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक,
अशासकीय विनाअनुदानित व्यावसायिक महाविद्यालये/ मान्यताप्राप्त शिक्षण संस्था,

विषय :- अशासकीय विनाअनुदानित व्यावसायिक महाविद्यालयातील प्राचार्य व अध्यापक पदांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत.

संदर्भ :- १) क्र. संकिर्ण-२०१०/(५०३/१०)विशि-१ दि. ०५ मार्च, २०११ चा शासन निर्णय,
२) क्र. संकिर्ण-२०११/(३९६/११)विशि-१ दि. २३ नोव्हेंबर, २०११ चा शासन निर्णय,
३) क्र. संकिर्ण-२०११/(३९६/११)विशि-१ दि. ०१ डिसेंबर, २०११ चा शासन निर्णय,
४) क्र. संकिर्ण-२०११/(३९६/११)विशि-१ दि. २३ फेब्रुवारी, २०१२ चे शासन शुध्दीपत्रक,

महोदय /महोदया,

आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भीय शासन निर्यणामध्ये शासकीय/अशासकीय महाविद्यालयातील प्राचार्य व अध्यापकांच्या सेवानिवृत्ती वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत आढावा समित्यांचे गठन तसेच इतर मार्गदर्शक सुचनांचे विस्तृत विवेचन केले आहे. परंतु त्यामध्ये अशासकीय विनाअनुदानित व्यावसायिक महाविद्यालयातील प्राचार्य व अध्यापक पदांच्या सेवानिवृत्ती वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत आढावा समिती अथवा मार्गदर्शक सुचनांचा समावेश केलेला नाही. त्यामुळे सदर महाविद्यालयातील प्राचार्य व अध्यापकांच्या सेवानिवृत्ती वयोमर्यादा वाढविण्यासंदर्भात अडचणी निर्माण होत आहेत.

यासंदर्भात उपरोक्त शासन निर्णयापैकी क्रमांक १ च्या शासन निर्णयामध्ये मुद्दा क्रमांक ९ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद केली आहे.

मुद्दा क्र. ०९ **अकृषी विद्यापीठाशी संलग्नित/ महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्नित अशासकीय (कायम विनाअनुदानित) शैक्षणिक संस्थामधील अध्यापक/ प्राचार्य यांना मुदतवाढ देण्याबाबतचा निर्णय संबंधित संस्थेने त्यांच्या स्तरावर घ्यावा.**

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेवून विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आपणास कळविणेत येते की, **अशासकीय विनाअनुदानित तसेच व्यावसायिक महाविद्यालयातील प्राचार्य व अध्यापक पदांच्या सेवानिवृत्ती वयोमर्यादेत वाढ करण्यासाठी संस्थास्तरावर मार्गदर्शक तत्वानुसार निकष तपासण्या करिता समिती तयार करुन त्याचा अहवाल विद्यापीठास माहितीसाठी सादर करावा .**

कळावे,

आपला विश्वासू,

13/03/15
संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ
विकास मंडळ,